MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०२ | अंक -१५ | बुधवार दि.०२ ऑक्टोबर २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -15 | WEDNESDAY DT.02 OCTOBER 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

## गोरक्ष कांबळे ची नॉर्वे देशातील शिक्षण पद्धतीचा अभ्यास करण्यासाठी निवड



बीड ।प्रतिनिधी

बीड पोलीस दलातील कर्तव्यदक्ष महिला पोलीस हवालदार श्रीमती सुभद्रा लिंबाजी चव्हाण व रिटायर्ड मेजर सिद्धार्थ कांबळे यांचा मुलगा गोरक्ष सिद्धार्थ कांबळे यांची पुणे विद्यापीठाच्या शिक्षण शास्त्र विस्तार विभागा मार्फत स्टुडन्ट मोबीलिटी प्रोग्राम अंतर्गत नॉर्वे देशात २१ दिवसाच्या नॉर्वेजीयन शिक्षण पद्धतीवर अभ्यास करण्यासाठी निवड झाली असून ते पुणे विद्यापीठात चडल इएव मध्ये शिक्षण घेत आहेत. भारतीय शिक्षण पद्धत व ब्रिटिश पद्धतीचा भारतीय शिक्षण पद्धतीवर झालेला प्रभाव या विषयावर ते नॉर्वे या ठिकाणी भाष्य करणार आहेत तसेच तेथील प्रगत शिक्षण व्यवस्था कशी चालते याचा अभ्यास करून विद्यापीठास प्रबंध सादर करणार आहेत. त्यांचे सर्व स्तरातून कौतुक व शुभेच्छा मिळत आहेत.

भाग - १



गर्भपाताचा आरोप कोवीड मध्ये कोट्यावधी रुपयाचा घोटाळा अन् न्यायालयात खटला चालू असताना

# डॉ. अशोक थोराताची बीड जिल्हा शल्यचिकीत्सकपदी नियुक्ती का ?

## आरोग्य मंत्री तानाजी सावंत पालकमंत्री धनंजय मुंडेनी उत्तर द्यावे.



- बीड जिल्हा शल्य चिकित्सक पदी नव्याने बसविण्यात आलेले डॉअशोक थोरात यांच्या कार्य काळामध्ये झालेल्या कुळ साहित्य निधी खर्चबाबतची तक्रार चौकशी सुरू असताना पुन्हा बीडला कसे व कोणत्या नियमाने दिले हे पालकमंत्री धनंजय मुंडे व माजलगावचे आमदार प्रकाश सोळुंके यांनी सांगाव.?



- बीड जिल्हा रुग्णालयात कोवीड कार्यकाळामध्ये कोट्यावधी रुपयाचा घोटाळा झाला आहे डॉ अशोक थोरात याची चौकशी सुरू आहे?
- २०१९ मध्ये पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी केली होती डॉक्टर अशोक थोरात यांची बीड जिल्ह्याच्या बाहेर बदली व्हावा म्हणून निवडणूक आयोगाकडे तक्रार त्याचीही पत्र उपलब्ध

बीड /प्रतिनिधी

जिल्ह्याचे भूमिपुत्र डॉ. अशोक थोरात यांच्यावर गर्भपाताचा गंभीर आरोप असून या संदभात न्यायालयात खटलाही चालू आहे. आणि गंभीर बाब म्हणजे कोरोना काळात जिल्हा शासकीय रुग्णालयात मोठ्याप्रमाणात भ्रष्टाचाराचे अनेक कारनाम चव्हाट्यावर आले होते. या संदर्भात मोठ्या प्रमाणात तक्रारी झाल्या. बीड जिल्ह्याचे नाव महाराष्ट्रात हिट लिस्टवर आले होते. एवढचा मोठ्या प्रमाणात कुठ ना कुठ डॉ. अशोक थोरात यांचे नाव पुढे येत असताना शासनाने पुन्हा त्यांना बीड जिल्हा शासकीय रुग्णालयाचे जिल्हा शल्यचिकित्सक म्हणून बदली केली आहे. त्यामुळे आता पुन्हा एकदा पाठीमागील सर्व प्रकरणाचा सविस्तर सखोल आणि मुद्देनिहाय वृत्त प्रकाशित केले जाणार आहे. त्यामुळे वाचकांनी पुढील अंकात गर्भपात कोठे झाला? कसा झाला? कोण कोण यामध्ये सामील होते. कोरोना काळात कोरोना रूग्ण तडफडत असताना विविध संस्था व इतर माध्यमातून कसा भ्रष्टाचार झाला. यामध्ये कोण कोणत्या कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले. दोषी ठरविण्यात आले. या सर्व गोष्टीचा आता पुन्हा एकदा लेखणीच्या माध्यमातून लवा सुरू राहणार आहे.

परळी, माजलगावातील मराठ्यांच्या मतासाठी धनंजय मुंडे प्रकाश सोळंकेची डॉ अशोक थोराताना सिएस पदी बसवत मोठी खेळी.?

डॉ अशोक थोरात याच्या कार्यकाळामध्ये झालेल्या कोट्यवधी रुपयाचा घोटाळ्यात अशोक थोराताच्या चौकशी चालू आहे की नाही पालकमंत्री धनंजय मुंडे आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांना माहिती नाही का?

बीड:- डॉ.अशोक थोरात जिल्हा शल्य चिकित्सक बीड यांनी शासकीय सेवेत असताना केज तालुक्यातील तांबवा जिल्हा परिषद गटातुन जिल्हा परिषदेची निवडणूक लढवणे तसेच जिल्हा शल्य चिकित्सक पदावर असताना राजकीय सहभाग असल्याची लेखी तक्रार तत्कालीन विरोधी पक्षनेते आणि विद्यमान कृषीमंत्री महाराष्ट्र राज्य व पालकमंत्री बीड यांनी लेखी तक्रार मुख्य निवडणूक आयुक्त, निवडणूक आयोग महाराष्ट्र राज्य मुंबई यांना केली होती. त्यांचा पुर्व इतिहास पाहता त्यांची कृती महाराष्ट्र नागरी सेवा नियमातील तसेच आदर्श आचारसंहिता भंग करणारी असल्याने आगामी आचारसंहितेपुर्वी त्यांची तात्काळ बीड जिल्हा बाहेर बदली करून त्यांच्या विरूद्ध नियमातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात यावी अशी लेखी तक्रार सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी जिल्हाधिकारी बीड, निवडणूक निर्णय अधिकारी बीड, तहसीलदार बीड यांच्या मार्फत मुख्य निवडणूक आयुक्त, निवडणूक आयोग महाराष्ट्र राज्य मुंबई आणि कृषीमंत्री महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री बीड धनंजय मुंडे यांना केली असुन ठोस कारवाई न झाल्यास औरंगाबाद खंडपीठात जनहित याचिका दाखल करणार असल्याचे म्हटले आहे.

बीड जिल्हा शल्यचिकित्सक पदी नियुक्ती झालेले डॉ.अशोक थोरात हे मागील २०१७ ते २०२० दरम्यान बीड येथे जिल्हा शल्यचिकित्सक पदांवर काम करत असताना तत्कालीन विरोधी पक्षनेते विधान परीषद व विद्यमान कृषीमंत्री महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री बीड ना.धनंजयजी मुंडे आणियांनी दि.२७ फेब्रुवारी २०१९ रोजी मुख्य निवडणूक आयुक्त , राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र राज्य मुंबई यांना लेखी तक्रार केली होती की डॉ.अशोक थोरात हे बीड जिल्ह्यात मागील २० वर्षांपासून कार्यरत असुन त्यांनी अनेकवेळा शासकीय सेवेत असताना राजकारणात प्रत्यक्ष सहभाग घेतला आहे. बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील तांबवा जिल्हा परिषद गटातुन जिल्हा परिषदेची निवडणूक सुद्धा शासकीय सेवेत असताना लढवलेली आहे.जिल्हा शल्यचिकित्सक या महत्वाच्या पदावर असताना डॉ.अशोक थोरात यांचा राजकीय सहभाग स्पष्ट दिसुन येतो.आगामी सार्वत्रिक निवडणूका लक्षात घेता डॉ.अशोक थोरात यांची कृती महाराष्ट्र नागरी सेवा नियमातील तसेच आदर्श आचारसंहिता भंग करणारी असल्याने आचारसंहितेपुर्वी त्यांची तात्काळ बीड जिल्हा बाहेर बदली करून त्यांच्याविरुद्ध नियमातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात यावी.तसेच डॉ.अशोक थोरात यांच्यावर अवैध गर्भपात प्रकरणी फौजदारी गुन्हा दाखल असुन त्याप्रकरणी त्यांना निलंबित करण्यात आले होते व मा.उच्च तसेच सर्वोच्च न्यायालयाने डॉ.अशोक थोरात यांच्या विरूद्धचे दाखल झालेले गुन्हे कायम केलेले आहेत व सदर प्रकरण न्याय प्रविष्ट आहे.राजकीय वरद हस्ताने ते अद्याप बीड जिल्ह्यात कार्यरत असुन सध्या ते सत्ताधारी पक्षाचा शासकीय सेवेत असताना प्रचार करत आहेत.सदर प्रकरणाचे संपूर्ण पुरावे सोबत जोडण्यात आलेले आहेत असे म्हटले आहे.



माजलगाव विधानसभेसाठी ईच्छुक डॉ . अशोक थोरात यांचा स्वेच्छानिवृत्ती अर्ज चौकशी सुरू असल्याने फेटाळला

माजलगाव विधानसभा मतदार संघात निवडणूक लढवण्यासाठी डॉ.अशोक थोरात यांनी ३ महिन्यांपुर्वी दि.०५.०६.२०२४ रोजी महिन्यांपुर्वी स्वेच्छानिवृत्ती साठी अर्ज ( ज.- .छे.८८४/२०२४) दिला होता.मात्र कोविड मधील गैरव्यवहार प्रकरणी त्यांची चौकशी सुरू असल्याने त्यांचा अर्ज दि.१९.०६.२०२४ रोजी फेटाळण्यात आला आहे.

धनंजय मुंडे यांनी काय तडजोड केली??:- डॉ.गणेश ढवळे

कृषीमंत्री महाराष्ट्र राज्य व पालकमंत्री बीड यांनी विरोधी पक्षनेते असताना डॉ.अशोक थोरात यांचा शासकीय सेवेत बीड जिल्हाशल्य चिकित्सक सारख्या महत्वाच्या पदावर असताना राजकीय सहभाग असल्याचा पुराव्यानिशी लेखी तक्रार करत डॉ.अशोक थोरात यांची कृती महाराष्ट्र नागरी सेवा नियमातील तसेच आदर्श आचारसंहिता भंग करणारी असल्याने आचारसंहितेपुर्वी त्यांची तात्काळ बीड जिल्हा बाहेर बदली करण्यात यावी असे म्हटले होते. आता पालकमंत्री बीड धनंजय मुंडे सत्तेत असताना बीड जिल्हा शल्य चिकित्सक पदी डॉ.अशोक थोरात यांची नियुक्ती नेमकी कोणती तडजोड करून करण्यात आली असा सवाल डॉ.गणेश ढवळे यांनी विचारला आहे.

# गुलाबी राजकिय प्रचार विरोधात लाल वादळ

## विविध योजना राबवत लाचार करण्याचे काम सुरु-कॉ.डॉ.अजित नवले

**धारूर / प्रतिनिधी**

**जिल्ह्यात जन्मसन्मान यात्रेच्या माध्यमातून सरकारी यंत्रणेचा गैरवापर करत गुलाबी राजकीय प्रचार एका बाजूला सुरू असताना अस्मानी आणि सुलतानी संकटात जीवन मरणाच्या यातना सहन करणारा शेतकरी लाल झेंड्याखाली एकत्र येत शेतकऱ्यांनी मेळाव्याचा माध्यमातून बीड जिल्ह्यातील पिक विमा वितरण याद्या प्रकाशित करून सोयाबीनला सात हजार, कापसाला दहा हजार रुपये केलेल्या घोषणांची आणि नैसर्गिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांकरिता सरकारने केलेल्या प्रत्येक घोषणाची प्रत्यक्ष कृती कार्यक्रम राबवावा असा ठराव मंगळवार दि १ रोजी माजलगाव तालुक्यातील तेलगाव येथे झालेल्या भव्य शेतकरी मेळाव्यात एकमुखाने घेण्यात आला आहे.४ आक्टोबर पासून तेलगाव येथे बेमूदत धरणे आंदोलन करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आले.**




**शेतकरी मेळाव्याने तेलगाव परिसर गजबजला ४ आक्टोबर पासुन तेलगाव मध्ये बेमूदत धरणे आंदोलन**

बीड जिल्ह्याचे माजी खासदार, अखिल भारतीय किसान सभेचे राज्य अध्यक्ष झुंजार स्वातंत्र्यसेनानी कॉ.गंगाधरअप्पा बुरांडे यांच्या स्मृतीदिना निमित्य तेलगाव येथील वृंदावन मंगल कार्यालय या ठिकाणी भव्य शेतकरी मेळाव्याचे आयोजन बीड जिल्हा किसान सभेकडून करण्यात आले होते.या प्रसंगी किसान सभेचे राज्य सचिव कॉ.डॉ.अजित नवले हे प्रमुख वक्ते, अध्यक्षस्थानी कॉ.काशीराम सिरसाट,स्वागताध्यक्ष कॉ.दत्ता डाके, किसान सभेचे जिल्ह्याध्यक्ष कॉ.एड.अजय बुरांडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना कॉ.नवले यांनी अभ्यासपूर्ण मांडणी करत राज्य सरकारची शेतकरी आणि शेती विषयक उदासीन धोरणे स्पस्ट करत सत्तेत असणारी राजकीय मंडळी विविध योजना राबवत राज्यातील जनतेला लाचार बनविण्याचे काम करत असून लाचार व्यक्ती करण्याचे सुनियोजित कार्यक्रम सत्तेत असलेल्या धर्मांध, जातीयवादी मंडळी करत आहे.कष्टकरी, शेतकरी याना घामाचा मोबदला द्यायचा नाही त्यांना स्वाभिमानाने जगू न देता लाडक्या योजना राबवून लाचार बनविण्याचे काम हे सरकार करत आहे. शेती, शेतकरी,आरोग्य, शिक्षण, रोजगार या बाबतीत सत्ताधारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून नाना प्रकारे भावनिक राजकारण करण्यात विद्यमान सत्तेतील लोक शासकीय यंत्रणा आणि सरकारी पैसा खर्च करत आहे.राज्याचे कृषी मंत्री हे देशात सर्वाधिक आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांचा जिल्हा म्हणून ओळखल असलेल्या जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व करतात मात्र याच जिल्ह्यातील शेतकरी आजमितीस अस्मानी आणि सुलतानी संकटात जीवन मरण यातना भोगत आहे. बीड जिल्ह्यातील पीक विमा प्रकरण मागील अनेक वर्षापासून किसान सभा उचलून धरत असून सर्वात मोठा पीक घोटाळा उघडकीस येऊ नये म्हणून पीक विमा वाटप याद्या प्रकाशित करण्यात येत नाहीत. राज्याच्या कृषीमंत्राना शेती, शेतीचे ज्ञान, कृषिमूल्य आयोग, आयोगाची कर्तव्य आणि जबाबदारी, आधार भाव, भावांतर, राज्याची आणि केंद्राची याबाबत भूमिका याबद्दल शून्य ज्ञान असून गुंड प्रवृत्तीचे चारित्र्य असलेले सरकार राज्यात सत्तेवर आहे ही शोकांतिका आहे असे परखड मत व्यक्त केले.

या शेतकरी मेळाव्याच्या प्रास्ताविकात किडण सभेचे जिल्हाध्यक्ष कॉ.एड अजय बुरांडे यांनी शेतकऱ्यांच्या या संकट काळात विविध मेळावे घेताना सरकारने केलेल्या घोषणांची किती अंमलबजावणी केली.दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना किती मदत केली हे जाहीर करावे असे आवाहन करत निवडणूक डोळ्यासमोर ठेऊन सरकारी यंत्रणेचा गैरवापर करत राजकिय प्रचार करण्यापेक्षा कर्ज माफी, विमा वाटप, २०१७ पासून केलेल्या विविध सानुग्रह अनुदान वाटप तात्काळ करण्यात यावे अन्यथा किसान सभेकडून तीव्र पाऊले उचलली जातील असा इशारा सरकारला दिला.

या मेळाव्यात स्वागताध्यक्ष कॉ.दत्ता डाके यांनी किसान सभा निवडणूक तिकीट, राजकीय स्वार्थ न बघता फक्त शेतकऱ्यांच्या प्रश्नावर, त्याच्यावर होणाऱ्या अन्यायावर काम करणारी संघटना असल्याचे सांगितले.

# कमरेला गावठी कट्टा(पिस्टल) लावून फिरणाऱ्या

## स्था.गु.शा.बीड ने पकडुन एक गावठी गट्टा मुधेमाल केला जप्त

मा.पोलीस अधीक्षक,बीड यांनी अवैध शस्त्र बाळगणारे विरुध्द कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत त्यावरुन पोलीस निरीक्षक श्री.उस्मान शेख स्था.गु.शा.बीड यांनी वरिष्ठांचे आदेशाप्रमाणे अवैध शस्त्र बाळगणारे विरुध्द कारवाई करण्यासाठी अधिपत्याखालील अधिकारी यांना योग्य मार्गदशकन केले. त्यावरुन दिनांक ०१/१०/२०२४ रोजी स्थागुशा येथील पोह/अशोक दुबाले, यांना गुप्त बातमीदारा मार्फत इसम नामे शिव सुनिल खोसे रा. माळीवेस याचेकडे गावठी कट्टा असल्याची खबर मिळाली, सदर खबर पो.नि. श्री.उस्मान शेख, स्थागुशा बीड यांना कळवुन त्यांनी पोउपनि मुरकुटे यांचे पथकास कारवाई करण्याचे आदेश दिले. त्यानंतर पोउपनि मुरकुटे यांनी पथकासह सदर इसमाचा शोध घेण्यास सुरुवात केली , जालना रोडवरील मिलन बिअरबार समोर असल्याची माहिती मिळाली तेव्हा सापळा लावुन इसम नामे शिव सुनिल खोसे रा. मलिवेस बीड यास शिताफीते पकडुन त्याचेजवळ अवैधरित्या एक गावठी बनावटीची पिस्टल व एक जिवंत राऊंडसह मिळुन आला आहे. सदर इसमास ताब्यात घेवुन त्याचे विरुध्द सरकार तर्फे पोह/मनोज वाघ यांनी दिलेल्या फिर्याद वरुन पो.स्टे.बीड ग्रामीण येथे कलम



३,२५ भारतीय शस्त्र अधिनियम अन्वये गुन्हयाची नोंद करण्यात आली आहे. आरोपीचे ताब्यातुन एक गावठी पिस्टल व एक जिवंत काडतुस असा एकुण किंमती ४१,०००/- रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी मा.श्री. अविनाश बारगळ पोलीस अधीक्षक,बीड , मा.श्री. सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक बीड, पोनि श्री. उस्मान शेख स्था.गु.शा.बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि सिध्देश्वर मुरकुटे, सफौ/तुळशिराम जगताप,पोह/अशोक दुबाले, पोह/कैलास ठोंबरे, मनोज वाघ, राहुल शिंदे, पोना/विकास वाघमारे, पोशि/नारायण कोरडे, यांनी केली आहे.

# बीड विकासाचा खेळखंडोबा करणाऱ्या जयदत्त क्षीरसागरांचे अनुकरण करण्याची अनिलदादा जगताप यांना गरज नाही

## जयश्रीताई विधातेंच्या टिकेला शिवसेना जिल्हा समन्वयक दीपक काळे यांचे सणसणीत प्रतिउत्तर!

बीड ।प्रतिनिधी

गेल्या अनेक वर्षांपासून सत्ता भोगून बीड विकासाचा खेळ खंडोबा करणाऱ्या जयदत्त क्षीरसागर यांना सत्तेच्या मोहापुढे स्वतःचे पुतणे सांभाळता आले नाहीत त्या जयदत्त अण्णांच्या बगलबच्यांनी आम्हाला क्षीरसागरांनी न केलेल्या विकासाचे ज्ञान पाजाळू नये. स्वतःची राजकीय पोळी भाजण्यासाठी बीड मतदार संघात अचानक सांस्कृतिक, धार्मिक कार्यक्रम आयोजित करायचे त्यात स्वतःच्या संस्थेतील कर्मचारी गोळा करून विकासपुरुष म्हणून मिरवायचे आणि मतांची भीक मागायची असला भिकारचोट धंदा आजवर शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांना कधी जमला नाही आणि यापुढेही ते कधी करणार नाहीत. जयदत्त अण्णा क्षीरसागर विकास मंचाच्या महिला आघाडी प्रमुख सौ. जयश्रीताई विधाते यांनी अगोदर माजी मंत्री क्षीरसागरांनी बीड मतदार संघात जन्माला घातलेला विकास शिवसेना मध्यवर्ती कार्यलयात घेऊन यावा म्हणजे निदान आम्हा शिवसैनिकांना तरी जयदत्त अण्णांच्या विकासाचे दर्शन घडेल व त्यानंतर मग आम्हाला देखील त्याचे अनुकरण करता येईल असे सणसणीत प्रतिउत्तर शिवसेना जिल्हा समन्वयक दिपक काळे यांनी जयश्रीताई विधाते यांनी केलेल्या टिकेला दिले आहे.



काल रोजी जयश्रीताई विधाते यांनी जयदत्त अण्णांच्या होम मिनिस्टर कार्यक्रमाचे अनुकरण करूण्याऐवजी अण्णांनी केलेल्या विकसाचे अनुकरण केले असते तर बरे झाले असते अशी टिका अनिलदादा जगताप यांचे नाव न घेता केली होती व याबरोबर प्रत्येक कार्यक्रमात त्या आपल्या भाषणात वारंवार हीच टिका करत आहेत. याच टिकेला प्रतिउत्तर देण्याकारिता शिवसेनेच्या दीपक काळे यांनी पत्रक जाहीर करून जयश्रीताई यांचा चांगला समाचार घेतला आहे. या पत्रकात दिपक काळे यांनी पुढे म्हंटले आहे की, आजवर क्षीरसागर यांनी केवळ बीडकरांची दिशाभूल करून बीडच्या विकासाची गळचेपी केली आहे. म्हणूनच आज बीड मतदार संघात क्षीरसागर मुक्तीचा सूर उमठला आहे. माणुसकीचा खरा चेहरा म्हणून जिल्हाप्रमुख अनिलदादा यांची ओळख बीड मतदार संघात आहे. राजकारणाच्या मापदंडात राहून अनिलदादांनी समाजसेवेचा तप केला आहे म्हणूनच आजच्या तिथीला गाव, वस्ती, वाडा तांड्यावरून लहानपासून ते थोरापर्यंतची माणसं अनिलदादा यंदा तुम्ही आमदार व्हा अशी आर्तहाक देत मानतील इच्छा व्यक्त करत आहेत. त्यामुळे अनिलदादा यांना विकासाच्या भूल थापा मारून स्वघोषित विकासपुरुष म्हणून मिरवणाऱ्या जयदत्त क्षीरसागर यांचे व राजकीय फायद्यापोटी घेण्यात आलेल्या कार्यक्रमांचे अनुकरण करण्याची गरज नाही. अनिलदादा जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली बीडमध्ये साकार होत असलेली होम मिनिस्टर खेळ पैठणीचा ही स्पर्धा केवळ महिला भगिनींच्या मनोरंजनासाठी आयोजित केली आहे. यामधून अनिलदादा जगताप यांना कुठलीही स्वतःची राजकीय प्रसिद्धी करून घ्यायची नाही व त्याची अनिलदादांना गरज सुद्धा नाही. यामुळे साहजिकच बीड मतदार संघात स्वतःच्या राजकीय फायदा बघून वार्डनिहाय आयोजित केलेल्या होम मिनिस्टर स्पर्धेचे अनुकरण अनिलदादांना करायचेच नाही याची नोंद जयश्रीताईंनी घ्यावी

## जि प कन्या शाळेचे शिक्षक विकास अडागळे याना दोन गटात व्हिडीओ निर्मीतीत प्रथम सर्वज्ञ कौतूक

धारूर ।प्रतिनिधी



राज्य शैक्षणीक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे मार्फत आयोजित शिक्षकांसाठी दर्जेदार व्हिडियो निर्मिती स्पर्धा २०२३- मध्ये धारूर तालूक्यातुन तालुकास्तरा वर दोन गटात जिल्हा परीषद कन्या प्राथमीक शाळेचे शिक्षक विकास अडागळे यानी प्रथम क्रमाक मिळवला असून तंत्रस्नेही शिक्षक म्हणुण निवड झाली आहे.

राज्य शैक्षणीक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे मार्फत आयोजित शिक्षकांसाठी दर्जेदार व्हिडियो निर्मिती स्पर्धा २०२३- मध्ये धारूर तालुका स्तरावरील निकाल जिल्हा परिषद कन्या प्राथमिक शाळा धारूर शाळेतील अष्टपैलू आदर्श उत्तम तंत्रस्नेही शिक्षक विकास अडागळे यांची निवड.इयत्ता पहिली दुसरी विषय भाषा विषयात प्रथम क्रमांक व इयत्ता तिसरी व पाचवी विषय परिसर अभ्यास प्रथम क्रमांकमिळवला असुन वरील दोन्ही गटामध्ये सरनी प्रथम क्रमांक मिळवत जिल्हा परिषद कन्या प्राथमिक शाळा धारूर तालुका धारूर जिल्हा बीड मुख्याध्यापक व सर्व स्टाफ सरांचे हार्दिक अभिनंदन करत आहे गटशिक्षणाधिकारी मनोज कोल्हे ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी शिवाजीराव अंडील तसेच गणेश गिरी धारूर केंद्राचे केंद्रप्रमुख सय्यद हकीम मुख्याध्यापक शातीनात मुंडे आदीनी त्याचे कौतूक केले आहे

## टाकळीत टॅक्टर तर आष्टीत जेसीबी,टॅक्टर, डंप्पर वर महसुलच्या पथकाची धाड

आष्टी ।प्रतिनिधी

टाकळी अमियाच्या नदीपात्रात अवैधरित्या वाळूचा उपसा होत असल्याची माहिती तहसीलदार वैशाली पाटील याना मिळताच त्यानी पथकासह नदीपात्रात धाड टाकुन एक टॅक्टर वाळूसह ताब्यात घेत सोमवारी रात्री दहाच्या दरम्यान कारवाई केली.तर आष्टी शहरात वाळूचे डंप्पर, टॅक्टर, जेसीबीवर मंगळवारी सकाळी अकराच्या दरम्यान कारवाई केली.

आष्टी तालुक्यातील टाकळी अमिया येथील नदीपात्रात गेल्या अनेक दिवसांपासून अवैधरित्या वाळूचा उपसा होत असल्याचे दिसून येत होते.पण महसुल विभागाकडून कारवाई करण्यास कानाडोळा होत होता.आष्टी तहसीलदार म्हणून नुकताच पदभार घेतलेल्या वैशाली पाटील याना ही माहिति मिळताच त्यानी सोमवारी रात्री दहाच्या दरम्यान तलाठी योगेश गोरे,मोहन पाचंगे,दादाराव गवळी,प्रवीण बोरूडे,जगदीश राऊत याच्यासह कडा चौकीच्या पोलिसांना सोबत घेऊन नदीपात्रात धाड टाकली असता वाळूने भरलेला एक टॅक्टर आढळून आल्यानंतर ताब्यात घेतला.तर आष्टी शहरातील मुर्शदपूर परिसरात वाळूने भरलेला डंप्पर, जेसीबी,टॅक्टरवर कारवाई करत ताब्यात घेण्यात आले. ही कारवाई आष्टीच्या तहसिलदार वैशाली नेमगोंडा, मंडळधिकारी सुभाष गोरे,शरद शिंदे,तलाठी ज्ञानदेव अनारसे,रवि पवार,कागदे,राजकुमार आचार्य, सचिन तेलंग,याच्यासह संभाजी गोरे,दिलीप गाडफाडे,नवनाथ सोनटक्के, कुंदन बावरे,जयदत्त चव्हाण, दळवी आदि सहभागी होते.

## राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसच्या मराठवाडा विभागीय अध्यक्षपदी- कुंदन काळे



बीड ।प्रतिनिधी

**सामाजिक कार्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटात सक्रिय असलेले कुंदन काळे यांच्यावर पक्षाकडून नवीन जबाबदारी देण्यात आली आहे. त्यांची राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसच्या मराठवाडा विभागीय अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे.**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या मान्यतेने कुंदन काळे यांची राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस शरदचंद्र पवार मराठवाडा विभाग अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. या निवडीचे पत्र खासदार बजरंग सोनवणे, खा.अमोल कोल्हे यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी आमदार संदीप क्षीरसागर, राजेश टोपे, युवक प्रदेशाध्यक्ष शेख महेबुब, विद्यार्थी प्रदेशाध्यक्ष सुनील गव्हाणे आदींची उपस्थिती होती.

विद्यार्थ्यांच्या विकासात भरीव कार्य करणार - कुंदन काळे

शरदचंद्र पवार साहेब यांच्या विचारांनुसार येणाऱ्या काळात विद्यार्थी संघटनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या विकासात भरीव कार्य व संघटना मजबुतीने उभी करण्यासाठी प्रयत्न करणार असून पक्षाने दिलेली जबाबदारी यशस्वीरित्या पार पडणार असल्याची प्रतिक्रिया कुंदन काळे यांनी दिली.

## जयदत्त अण्णांच्या होम मिनिस्टरमुळे शहरातील महिलांनी घेतला मोकळा श्वास-सौ.जयश्रीताई विधाते

### यंदा फक्त जयदत्त अण्णाच ;प्रत्येक प्रभागातील महिलांच्या बोलक्या प्रतिक्रिया



बीड ।प्रतिनिधी

काकू नाना प्रतिष्ठान आणि माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर विचार मंचच्या वतीने सुरू असलेल्या होम मिनिस्टर कार्यक्रम घराघरात पोहचला आहे,प्रत्येक प्रभागातील महिला मोठ्या संख्येने सहभागी होत मोकळा स्वास घेऊ लागल्या आहेत,त्यांचा हा आंनद बघून समाधान होत आहे,यंदा फक्त जयदत्त अण्णांच आशा प्रतिक्रिया महिला भगिनी व्यक्त करत असल्याचे प्रतिपादन महिला आघाडी प्रमुख जयश्री विधाते यांनी केले आहे. त्या काकू- नाना प्रतिष्ठान आयोजित जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या १४ दिवसापासून सुरू असलेल्या होम मिनिस्टर चंपावती सम्राज्ञी २०२४खेळ पैठणीचा कार्यक्रम प्रभाग क्रमांक सोळा विठ्ठल रुक्मिणी मंदिर चंपावती नगर बार्शी रोड येथे आयोजित कार्यक्रमात बोलत होत्या. याप्रसंगी व्यासपीठावर सौ.कुसुमताई क्षीरसागर सौ.मेघा राजेश मचाले सौ.निलावती तुकाराम शेरकर सौ.प्रमिला अर्जुन जाधव,सौ. सुमन बडगे सौ.शकुंतला गंडाळ,सौ. दिपाली नाळपे सौ.कच्ची मॅडम सौ. अनिता डोंगरे,सौ. उषाताई सरवदे,सौ. इंदरबाई मुळूक,सौ. पालशिंगणकरताई सौ. जाधवताई आदी मान्यवर महिलांच्या उपस्थितीत या कार्यक्रमाचे उद्घाटन झाले .

यावेळी बोलताना जयश्री ताई म्हणाल्या की बीड जिल्ह्यात आता एकमेव अभ्यासू नेता जर कोण असेल तर ते जयदत्त आण्णा आहेत,प्रत्येकाला आपली सुरक्षितता महत्वाची असते,म्हणून आपल्याला आपली सुरक्षितता हवी असेल तर अण्णांच्या हाती आपले पालकत्व देण्याची गरज आहे,जनतेने प्रत्येकाला संधी दिली आहे पण त्या संधीच सोन जनतेसाठी नाही तर स्वतःसाठी करणारे निघाले हे जनताही आता मान्य करू लागली आहे,गल्लीपासून दिल्लीपर्यंत ज्या नेत्यांचे वजन आहे,विकासाचे कसब आहे अशा माणसाला निवडून दिले तरच विकासाचे स्वप्न पूर्ण होऊ शकते,आम्ही प्रत्येक प्रभागात जाऊन आलो जो तो म्हणतो क्षीरसागरच हवे पण जयदत्त अण्णा हवे,या बोलक्या प्रतिक्रिया सांगून जातात की, यावेळी जनतेनेच ठरवले आहे की ,आता शांत संयमी आणि विकासाची जाण असलेला आपला हक्काचा माणूस म्हणून अण्णांना निवडून द्यायचे आहे,होम मिनिस्टर हे निमित्त झाले पण या माध्यमातून लोकांच्या महिलांच्या आलेल्या प्रतिक्रिया यदा अण्णाला गुलाल लावणार आहेत.विरोधकांनी कितीही आटापिटा केला तरी काहीही उपयोग होणार नाही. कारण आण्णासारखा नेता नुसता आमदार नव्हे तर मंत्री म्हणून विधानसभेत जाऊ शकतो.ही लोक भावना वाढू लागली आहे. असे सांगून त्यांनी अण्णांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचे आवाहन केले.या कार्यक्रमात सर्वप्रथम येऊन पैठणी जिंकण्याचा मान सौ.उषा अविनाश चाटे यांना मिळाला तर इमिटेशन ज्वेलरीच्या मानकरी सौ.मंगल रविंद्र संकपाळे तर चौरंगाच्या मानकरी सौ.वैषाली देवेंद्र शेवाळे या ठरल्या उर्वरित सात महिलांना गिफ्ट हॅम्पर देण्यात आले.सौ. मनिषा दशरथ झांबरे , सौ.गितांजली प्रदिप गोरे,सौ. वैष्णवी माधव बोईनवाड, सौ.मनीषा शाहूराव शिंदे,सौ.डॉ.शितल महारुद्र क्षीरसागर,सौ.छाया अरुण तांबडे,सौ.वंदना किसन भोसले यांना मिळाले

# ऑक्टोबर व नोव्हेंबरचे लाडकी बहिण योजनेचे पैसे १० ऑक्टोबर पर्यंत देणार

## समाजातील सर्व समाज घटकांच्या सर्वांगीण, सर्वसमावेशक, समतोल विकासासाठी हे सरकार वचनबद्ध - अजितदादा पवार

परळी ।प्रतिनिधी

समाजातील सर्व समाज घटकांचा सर्वांगीण, सर्वसमावेशक, समतोल विकास करण्यासाठी महायुतीचे हे सरकार वचनबद्ध असल्याची ग्वाही उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी परळी येथे दिली. त्याचप्रमाणे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे ऑक्टोबर व नोव्हेंबर चे पैसे बहिणींच्या खात्यात १० ऑक्टोबर पर्यंत देणार असल्याची महत्त्वपूर्ण घोषणाही त्यांनी परळी येथील जन सन्मान यात्रेत केली. तर धनंजय मुंडे यांच्यावर २०२४ नंतर मोठी जबाबदारी असणार आहे असे संकेत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी यावेळी बोलताना दिले अजित दादांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्ह्याचा सर्वांगीण विकास करण्यासाठी कोणतीच कमतरता नसल्याने बीड जिल्ह्याचा सर्वंकष विकास निश्चित करू अशी ग्वाही पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली.

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजितदादा पवार यांच्या जनसन्मान यात्रेचे आयोजन परळी शहरात करण्यात आले होते.लाडक्या बहिणींच्या सशक्तिकरणाच्या दृष्टीने तसेच परळी मतदारसंघासह बीड जिल्ह्यातील लाडक्या बहिणींशी व नागरिकांशी ना.अजितदादा पवार यांसह प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे, कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांनी संवाद साधला. शहरातील वैद्यनाथ महाविद्यालयाच्या समोरील मैदानात अभूतपूर्व सभा झाली.तत्पूर्वी भव्य स्वागत मिरवून काढण्यात आली होती.

यावेळी बोलताना उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी सांगितले की, आम्ही लोकांना वाऱ्यावर सोडत नाही.आपल्याला विकास साधायचा असेल तर बीड-परभणीमध्ये विमानतळ होणं अत्यावश्यक आहे.. तरच एमआयडीसी, कारखानदारी येईल.रोजगार निर्मिती होईल.राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा सर्वांना न्याय देण्याची भूमिका घेणारा पक्ष आहे.ऑंक्टोबर व नोहेबरचे लाडकी बहिण योजनेचे पैसे आम्ही १० ऑंक्टोबर पर्यंत देणार आहोत. है पैसे स्वतः साठी वापरा, महिलांनी सन्मानांनी राहावे यासाठीच ही योजना आणली असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.बीड जिल्ह्यातील जनता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांवर प्रेम करते. माझे बीड जिल्ह्यावर प्रेम, परळीकरांवर विशेष प्रेम आहे. तालुक्यातील वडखेल येथे लवकरच सिताफळ इस्टेट उभी करणार आहोत, जिरेवाडी येथे शासकीय कृषी महाविद्यालय, कृषी व्यवस्थापन महाविद्यालयाला मंजुरी दिली आहे. शासनाच्या योजना तुमच्या पर्यंत पोहचवण्यासाठी जन सन्मान यात्रेचे आयोजन करण्यात आले. शासनाच्या योजनांच्या माध्यमातूनमहिलांना सक्षम, आत्मनिर्भर करण्याचा प्रयत्न आहे. १० व्या अर्थसंकल्पात महिलांना समोर ठेवून योजना ठरवण्यात आल्या. मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेवर ४६ हजार कोटी रुपये खर्च करत आहोत. केंद्रातील सरकार आपल्या विचारांचे असल्याने आम्ही म्हटल्या बरोबर कांदा निर्यातीवरील बंदी उठवली आहे. हे सरकार सर्वांगीण व समतोल विकास साधणारे सरकार असून विरोधकांच्या भुलतापाला बळी न पडता व सर्व लाभार्थ्यांना दिलेले सर्व लाभ कायमस्वरूपी ठेवण्यासाठी महायुती सरकारच्या पाठीशी खंबीरपणाने उभे रहा असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

मला जाणीवपूर्वक टार्गेट केलं जातं आहे, मला टार्गेट करणाऱ्यांना इथली जनता उत्तर देईल - धनंजय मुंडेविकासाच्या मुद्द्यावर आपण दादांच्या निर्णयाला साथ दिली, दादांच्या बोटाला धरून मी पक्षात आलो. जिथे एक पंचायत समिती सदस्य नव्हता त्या मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष्याला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ९०% यश मिळवून दिले. मात्र दादांच्या नेतृत्वात आम्ही न्यायाची साथ स्वीकारल्यापासून मला जाणीवपूर्वक टार्गेट केलं जातं आहे. मात्र मला टार्गेट करणाऱ्यांना माझ्या परळीची जनता मतपेटीतून उत्तर देईल, असे मत मंत्री धनंजय मुंडे यांनी व्यक्त केले.

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण महाराष्ट्राच्या विविध योजना व महत्त्वकांक्षी प्रकल्प पूर्ण होत आहेत. महायुतीच्या सरकारच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्य अग्रेसर आहे त्याच अनुषंगाने दादांच्या आशीर्वादाने व नेतृत्वाखाली काम करताना बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी कुठेही निधीची आपल्याला कमतरता नाही. बीड जिल्ह्यासाठी दादांच्या नेतृत्वाखाली मोठ्या प्रमाणावर विकासाची कामे व अनेक महत्वाकांक्षी प्रकल्प मंजूर झालेले आहेत. दादांचा वादा हा पक्का आहे त्यामुळे दादांना येणाऱ्या काळात पाठबळ देण्याचा वादाही आपल्याला निश्चित करावा लागेल




### धनंजय मुंडेंना २०२४ नंतर मोठी जबाबदारी -सुनील तटकरे

कृषीमंत्री धनंजय मुंडेंना २०२४ नंतर मोठी जबाबदारी देवू असे प्रतिपादन प्रदेशाध्यक्ष जयंत तटकरे यांनी केले.धनंजय मुंडे तुम्ही परळी पुरते नेते नाहीत तर संपूर्ण महाराष्ट्राचे नेते आहात, गोपीनाथ मुंडे नंतर विरोधी पक्षनेता कसा असावा हे धनंजय मुंडे यांनी महाराष्ट्राला दाखवले .आगामी विधानसभा निवडणुकीत फॉर्म भरायला धनंजय मुंडे येतील बाकी पूर्ण वेळ राज्यभरात राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रचाराची जिम्मेदारी त्यांच्यावर असेल. आयोजन नियोजन आणि जन संघटन याचे मोठ्या कौशल्य धनंजय मुंडे यांच्याकडे आहे ते एक प्रकारे शो मॅन असल्याचे गौरवोद्गार सुनील तटकरे यांनी यावेळी काढले.

# एमआयटी.विश्वशांती विद्यापीठ पुणे यांचा 'समर्पित जीवन गौरव पुरस्कार' महंत लक्ष्मण महाराज मेंगडे यांना जाहीर

नेकनूर ।प्रतिनिधी

विज्ञान अध्यात्म आणि तत्वज्ञान जागतिक परिषदेचे औचित्य साधून संबंध वारकरी संप्रदायाचा ध्यास आणि श्वास असणाऱ्या अध्वर्य ,घराण्यातील सत्पुरुष म्हणून एम.आय.टी. विश्वशांती विद्यापीठ, पुणे यांच्या वतीने सद्गुरु बंकटस्वामी महाराज संस्थानचे सर्वेसर्वा महंत गुरुवर्य लक्ष्मण महाराज मेंगडे यांना यावर्षीचा 'समर्पित जीवन गौरव पुरस्कार' जाहीर करण्यात आला असून ३ ऑक्टोंबर रोजी जागतिक परिषद सोहळ्यात पुणे येथे हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. यासंबंधीची घोषणा व तसे निमंत्रण श्री.महंत लक्ष्मण महाराज मेंगडे यांना मिळाले असून संतश्रेष्ठ श्री.ज्ञानेश्वर माऊली जन्म उत्सव सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्ष व श्री. संत जगत्गुरु श्री.तुकाराम महाराज यांचे ३७५ व्या वैकुंठ गमन सोहळा वर्ष पर्वात विज्ञान अध्यात्म आणि तत्वज्ञानाची सांगड असलेल्या जागतिक



परिषदेच्या औचित्याने माईर्स ( एम. आय. टी.) विश्वशांती केंद्र पुणे यांना वारकरी संप्रदायातील जुन्या परंपरेतील थोर, जाणकार, मानव कल्याणाचे कार्य करणाऱ्या, पावन घराण्यातील थोर निष्ठावंत अश्या धर्मप्रसारक सत्पुरुषांचा 'समर्पित जीवन गौरव पुरस्कार' देऊन सन्मान करण्यात येत आहे.

ज्या महात्म्याने सद्गुरु बंकटस्वामी परंपरेची सेवा केली. तसेच सद्गुरु जोग महाराज वारकरी शिक्षण संस्थेत विद्यमान परीक्षक या पदावरती कार्य करत संप्रदायाची वैष्णव परंपरा अगदी लहान वयापासून समर्थपणे सांभाळून अद्वैत भक्तीचे तत्व-भजन कथा किर्तने, प्रवचनाच्या माध्यमातून, महाराष्ट्रासह तीर्थक्षेत्रवृंदावन,ऋषिकेश,हरिद्वार,आयोध्या,जगन्नाथ पुरी,रामेश्वर धाम विविध तीर्थक्षेत्रावरती जाऊन अखंड हरिनाम सप्ताह केलें तसेच नारळी सप्ताहाच्या माध्यमातून जनप्रबोधनाचं कामही मोठ्या प्रमाणात केले अनाथ गोरगरीब मुलांचा सांभाळ करून उच्च शिक्षणापर्यंत अध्यात्मज्ञानाबरोबरच शिक्षणाची जोड दिली आज सद्गुरु बंकटस्वामी संस्थान मधील बरीच विद्यार्थी स्वतःच्या पायावरती उभे आहेत याचा श्रेय हे फक्त गुरुवर्य लक्ष्मण महाराज मेंगडे यांना जाते अनेक विद्यार्थी कीर्तन प्रवचन भजन सेवेच्या मध्मातून जनमानसात भक्ती भाव रुजऊन व लोकउध्दारक कार्य करतात अश्या विद्यार्थ्यांच्या गुरू गुरुवर्य महंत लक्ष्मण महाराज मेंगडे यांना ३ ऑक्टोंबर - घटस्थापनेदिनी खास सोहळ्यात विश्वराजबाग लोणी-काळभोर येथे सायंकाळी ६.०० वा. प्रदान करण्यात येत आहे. हा पुरस्कार जाहीर होताच सद्गुरु बंकटस्वामी संस्थानच्या हजारो शिष्य भक्तांनी पेढे वाटून फटाके फोडून आनंदोत्सव जल्लोष साजरा केला.



राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंती निमित्त आज बीड तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने गांधीजींच्या पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले यावेळी तालुकाध्यक्ष गणेश दादा बजगुडे पाटील, रामधन जमाले, डॉ. शेरखान, उमेश डमरे, मधुसूदन मस्के, सखाराम बेडगे आदी पदाधिकारी उपस्थित होते

# बीड शहरातील भव्य सत्कार सोहळ्यात वाल्मिकी समाज बांधव ताकदिनिशी सामील होणार: नरेश पिव्हाळ

## पप्पु कागदे यांच्या पाठीशी ताकद उभा करणार

बीड ।प्रतिनिधी

केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची केंद्रीय मंत्रिमंडळात तिसऱ्यांदा निवड झाल्याबद्दल बीड जिल्हा रिपाइंच्या वतीने रामदास आठवले यांचा भव्य सत्कार बीड शहरात युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली शनिवार (दि.५) ऑक्टोबर रोजी सायंकाळी ठीक ५ वाजता छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे आयोजित करण्यात आला आहे.

या भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजक पप्पू कागदे यांच्या प्रमुख उपस्थितीत वाल्मिकी समाज बांधवांची पेठ बीड विभागातील बतारवेस या ठिकाणी वाल्मिकी समाज बांधवांच्या उपस्थितीत मंगळवार (दि.३०) ऑक्टोबर रोजी बैठक संपन्न झाली. या बैठकीस राजू जोगदंड, किसन तांगडे, प्रा. बाळासाहेब गव्हाणे, अविनाश जोगदंड, विलास जोगदंड आदी उपस्थित होते.

रामदास आठवले यांच्या बीड



शहरातील भव्य सत्कार सोहळ्याचे औचित्य साधून शनिवार (दि.५) ऑक्टोबर रोजी बीड शहरातील राजुरीवेस पासून छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत काढण्यात येणाऱ्या भव्य रॅलीत व सत्कार सोहळ्यात बीड शहरातील वाल्मिकी समाज बांधवांनी हजारोंच्या संख्येने सामील होऊन भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजक पप्पू कागदे यांच्या पाठीशी वाल्मिकी समाजाची ताकद उभी करावी. असे आवाहन नरेश पिव्हाळ, सतपाल लाहोट, भारत पिव्हाळ, शुभम डुलगच, सुरज डुलगच, लखन पिव्हाळ, तिलक दिघानिया, मनू लाहोट, श्याम सीरसवाले,

# स्वच्छता सेवा पंधरवाडा निमित्त किल्ले धारूर नगर च्या वतीने शहरात विविध कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न

धारूर / रोहित फावडे

राष्ट्रपिता महात्मा गांधीजींना त्यांच्या जयंतीनिमित्त आदरांजली अर्पण करण्यासाठी २ ऑक्टोबर हा दिवस स्वच्छ भारत्त दिवस म्हणून साजरा केला जातो. त्याची पूर्वतयारी म्हणून स्वच्छ भारतासाठी स्वयंप्रेरणा आणि सांमूहिक कृतीला बळकटी देण्यासाठी २०१७ पासून वार्षिक स्वच्छता ही सेवा पंधरवाडा साजरा केला जात आहे. तरी या वर्षी स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत केंद्रीय गृहनिर्माण तथा शहरी कार्य मंत्रालय (चजक्रा-) यांनी स्वच्छता पंधरवाडा अंतर्गत दि. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर यादरम्यान स्वच्छता ही सेवा पंधरवाडा नगरपरिषद किल्ले धारूर येथे आयोजित करण्यात आला असून या अंतर्गत यावर्षी स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता ही अभियान राबविण्यात आले आहे.

सदर स्वच्छता ही सेवा पंधरवड्याच्या मुख्याधिकारी महेश गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली नगरपरिषद किल्ले धारूर तर्फे दि. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर यादरम्यान कालावधीत विविध कार्यक्रम घेण्यात





आले. यामध्ये ठिकाणी इङ-उघ डझजढड ओळखून त्या ठिकाणी स्वच्छता करून घेण्यात आली, तसेच नगरपरिषद धारूर कार्यालयात व शहरातील विविध शाळेत जाऊन स्वच्छता प्रतिज्ञा घेण्यात आली,सर्व शहरातील विद्यार्थ्यांसाठी चित्रकला आणि वेस्ट टू आर्ट स्पर्धा आयोजित करण्यात आली व सदर स्पर्धेमध्ये धारूर शहरांमधील २५०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला, वृक्ष संवर्धनसाठी एक पेड मां के नाम अभियान राबवण्यात आले या अंतर्गत नगरपरिषद पाणी वितरण केंद्र येथे सर्व कर्मचारी तथा सेवानिवृत्त कर्मचारी यांच्या आईचे नावे नारळाचे झाडाचे मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करण्यात आले, सर्व नगरपरिषद सफाई कर्मचारी करिता आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले, तसेच नगरपरिषद कार्यालयातील सफाई कर्मचार्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ प्रधानमंत्री सुरक्षा बीमा योजना, प्रधानमंत्री जीवन ज्योती बीमा योजना, आयुष्मान भारत आश्या योजनांचा लाभ मिळवून देण्यात आला आहे. व कार्यक्रमाच्या अंतिम दिवशी ०२/१०/२०२४ रोजी गांधी जयंती च्या पार्श्वभूमीवर सर्व नगरपरिषद कर्मचारी व स्वच्छता कर्मचारी यांच्यातर्फे नगरपरिषद परिसर व बाजार तळ परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले व नगरपरिषद कार्यालयांमध्ये महात्मा गांधी जयंती व लालबहादूर शास्त्री यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.तरी कार्यक्रमात मा. मुख्याधिकारी महेश गायकवाड, कार्यालयीन अधीक्षक श्री संजय जूजगर, लेखापाल श्री श्रीकृष्ण नागरगोजे, नगररचना सहाय्यक श्री विजय चटप इशरत मोमीन, सचिन डावकर माणिक लोखंडे, किरण नेहरकर, माणिक गायसमुद्रे, सुदर्शन शिनगारे स्वच्छता निरीक्षक आकाश वाघमारे ऋषिकेश तांबवे स्वच्छता शहर समन्वयक यशराज गायकवाड, स्वच्छता मुकादम केशव नाईकवाडे प्रधानमंत्री आवास योजना अभियंता साईनाथ शिनगारे प्रशांत पोहरकर जयराम गायसमुद्रे आकाश शिरसाट अजय गायसमुद्रे

# बीडच्या रेल्वे स्थानकाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव कायम करा

## उपसरपंच अनिल राधे कांबळे यांचे उपमुख्यमंत्री अजित पवारांना निवेदन

**माजलगाव ।प्रतिनिधी**

**बीडच्या रेल्वे स्थानकाला विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव कायम करा व तसेच माजलगाव शहरातील छत्रपती शिवाजी महाराज, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेकर, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकाचा प्रश्न मार्गी लावावा या मागणीचे निवेदन ब्रह्मगावचे उपसरपंच अनिल राधे कांबळे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना दिले आहे.**

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि, मागील काही दिवसापूर्वी बीड येथील रेल्वे स्थानकाला विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव आंबेडकरी जनतेच्या वतीने देण्यात आले होते परंतु पोलीस प्रशासनाने तेथील नावाचा बोर्ड आणि निळा झेंडा हटवला होता. हि बाब अत्यंत निंदनीय आहे. यामुळे आंबेडकरी जनतेच्या भावना दुखावल्या आहेत. तरी बीड येथे रेल्वे स्थानकाला विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव



देण्यात यावे. तसेच छत्रपती शिवाजी महाराज, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेकर, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकाचा प्रश्न कित्येक वर्षांपासून प्रलंबित आहे. तो मार्गी लावावा या मागणीचे निवेदन उपमुख्यमंत्री अजित पवार यांना देण्यात आले निवेदनावर उपसरपंच अनिल राधे कांबळे यांची स्वाक्षरी आहे.

# महात्मा गांधी जयंती निमित्त रिलायन्स फाउंडेशन च्या वतीने नाईक पब्लिक स्कूल तालखेड फाटा येथे स्वच्छता ही सेवा कार्यक्रम संपन्न

तालखेड ।प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील तालखेड फाटा येथील नाईक पब्लिक स्कूल येथे स्वच्छता ही सेवा महाराष्ट्रामध्ये १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत स्वच्छ्ता पंधरवडा म्हणून साजरा करतात या अनुषंगाने माजलगाव तालुक्यातील तालखेड येथे नाईक पब्लिक स्कूल मध्ये रिलायन्स फाउंडेशन कडून स्वच्छ्ता ही सेवा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमामध्ये शाळेतील मुलांना स्वाछतेची शपथ देण्यात आली आणि शाळेमधला परसर स्वच्छ करून मुलांना खाऊ वाटप करण्यात आला यामधे मुलांना स्वच्छ्ता विषयी





माहिती देण्यात आली आणि मुलांना बाल गीतांमधून स्वछतेचे महत्त्व पटऊन दिले या कार्यक्रमाला कार्यक्रमाचे कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शाळेचे प्राचार्य श्री . आळणे पी.एस.सर, तसेच कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. बोरखडे .एम.सरांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राऊत मॅडम यांनी केले. व कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सौ. घाटुळ मॅडम यांनी केले.होते तसचे या कार्यक्रमाचे आयोजन रिलायन्स फाउंडेशन चे जिल्हा प्रतिनिधी विजय खंडागळे आणि क्लस्टर मॅनेजर तज्जोदिन काझी यांनी केले होते.



# धम्मदीप सवाई यांची निवड

धाराशिव ।प्रतिनिधी

तालुक्यातील येवती येथील शिक्षक धम्मदीप सवाई यांची अखिल भारतीय प्राथमिक शिक्षक संघाच्या तालुका उपाध्यक्षपदी नुकतीच निवड झाली असून या निवडीबद्दल त्यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे. शिक्षक धम्मदीप यशवंत सवाई हे गत अनेक दिवसापासून शिक्षक आणि शिक्षकांच्या प्रश्नावर लढत आहेत त्यांनी अनेक शिक्षकांना न्याय मिळवून दिला आहे त्यांना शिक्षकांचे प्रश्न सोडवण्यासाठी आणि त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी एक व्यासपीठ असावे यासाठी अखिल भारतीय प्राथमिक शिक्षक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब वाघमारे राज्य उपाध्यक्ष तात्यासाहेब मगर जिल्हा सरचिटणीस अविनाश मोकाशी सह आदींनी अखिल भारतीय प्राथमिक शिक्षक संघाच्या धाराशिव तालुका उपाध्यक्षपदी निवड करून पुढील कार्य शुभेच्छा दिल्या आहेत. त्यांच्या या निवडीबद्दल उत्तम धन्वे, चंद्रसेन धन्वे, अनिल धन्वे, प्रतीक धन्वे, अक्षय धन्वे, सौरभ धन्वे, निशाद धन्वे, राज धन्वे, संतोष टिळक, संपादक उत्तम ओव्हाळ, गौतम ओव्हाळ सह आधींनी अभिनंदन केले आहे.

# सौ प्रियंका ताई शिवप्रसाद खेडकर यांना गेवराई विधानसभेसाठी मुस्लिम बांधवांचा वाढता पाठिंबा

चकलांबा ।प्रतिनिधी

गेवराई विधानसभा मतदारसंघातील महत्त्वाचे समजले जाणारे गाव म्हणजे कुरण पिंपरी या गावांमध्ये सायंकाळी ७:०० वाजता चकलांबा गावच्या कर्तव्यदक्ष सरपंच सौ प्रियंका ताई शिवप्रसाद खेडकर जनसंवाद मेळाव्याला कुरण पिंपरी गावातील मुस्लिम बांधवांचा उत्स्फूर्त पाठिंबा दिसून आला. गावातील सर्व मुस्लिम बांधव एकत्र येऊन ढोल ताशा वाजवून प्रियंका ताई खेडकर यांचे जंगी स्वागत केले. या जनसंवाद मेळाव्या च्या बैठकीमध्ये सर्व मुस्लिम बांधव तसेच गावातील महिला भगिनी एकत्र येऊन प्रियंकाताई शिवप्रसाद खेडकर यांनी येणारी विधानसभा निवडणूक लढवावी असा आदेश गावाच्या वतीने दिला. प्रियंका खेडकर ह्या मागील ८ महिन्यापासून चकलांबा गावाच्या सरपंच म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी चकलांबा गावाला मागील काही महिन्यामध्ये विकासाची दिशा दिलेली आहे. चकलांबा या गावाचा गेल्या आठ महिन्यांमध्ये झालेला कायापालट पाहून कुरण पिंपरी व संपूर्ण परिसर प्रियंका ताई शिवप्रसाद खेडकर यांच्या कार्यावर प्रेरित झाला आहे

प्रियंका खेडकर या इडल इएव असून त्यांचे सासरे श्री भगवान तात्या खेडकर हे ३ वेळेस चे चकलांबा गटाचे सदस्य राहिलेले आहेत. भगवान तात्या खेडकर हे स्व. गोपीनाथ



राव मुंढे साहेबांचे निकटवर्तीय म्हणून ओळखले जातात.

गावच्या आदेशाला उत्तर देताना प्रियंका खेडकर यांनी कुरण पिंपरी गावात असणारे विविध प्रश्न रस्त्याचा,शिक्षणाचा,आरोग्याचा त्याचबरोबर गावात येणारे विविध शासकीय योजना यामध्ये घरकुल योजना च्या माध्यमातून पक्की घरे बांधून देण्याचा, जलसिंचन विहिरी,गाय गोठे अशा विविध प्रकारच्या योजना कसलेही प्रकारचा भ्रष्टाचार न होऊ देता सर्वांचा सर्वांगीण विकास करण्याचा शब्द रसुलाबाद गावकऱ्यांना दिला तसेच तालुक्याने संधी दिली तर गेवराई माजलगाव व बीड तालुक्यातील (सिंदफणा गोदावरी नदीच्या पट्ट्यातील) १लाख हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणण्यासाठी प्रयत्न करेल असे सांगितले. तसेच तालुक्यातील सर्व तांडे - वस्त्या २ वर्षामध्ये कॉंक्रिट रोड ने जोडून देईल असे सांगितलं. तसेच तालुक्यातील प्रत्येक गटाचे व गणाचे गाव एक वर्षात कॉंक्रिट रोड ने जोडणार असे सांगितले. सर्व समाजातील लोकांचे घरे ५ वर्षात पक्के करण्याचा निर्धार केला. पंचायत समितीत भ्रष्टाचार मुक्त करण्याचा निर्धार व्यक्त केला. प्रियंका ताई च्या निर्णयाचे व दूरदृष्टीचे सर्व समाजातून कौतुक होत आहे व सर्व नागरिक त्यांना आमदार करण्यासाठी तालुका पिंजून काढतील असा शब्द दिला.

# पीपल्स रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया चा गायरान व विविध मागण्यासाठी जिल्हा कचेरीवर धडकला आक्रोश मोर्चा

## गायरान धारक, घरकुल, महामंडळ निधी , केज सूतगिरणी यास जो पर्यंत न्याय मिळणार नाही तोपर्यंत लढा चालूच - अनिल तुरुकमारे

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील गायरान जमिनीसहीत विविध मागण्यासाठी आक्रोश मोर्चा पी आर पी चे मराठवाडा सरचिटणीस तथा जिल्हाध्यक्ष अनिल तुरुकमारे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी कार्यालय आक्रोश मोर्चा काढण्यात आला. यामध्ये बीड जिल्ह्यातील असंख्य गायरान धारक, विविध शासनाच्या योजने पासून वंचित राहिलेले लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. बीड जिल्ह्यातील कसत असणाऱ्या शेतकऱ्यांना सातबारा तात्काळ देण्यात यावा. गायरान धारक शेतकऱ्यांच्या सातबारा वरील पोट खराब शब्द काढून त्यांना खरीप, रब्बी, पिक विमा भरण्याचा व राष्ट्रीयकृत बँकेकडून पिककर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा करून पंतप्रधान कृषी सन्मान निधीचा व इतर शासनाच्या सर्वयोजनेचा लाभ देण्यात यावा. महात्मा फुले महामंडळ, अण्णाभाऊ साठे महामंडळ संत रोहिदास चर्मकार महामंडळ, वसंतराव नाईक महामंडळ, अपंग महामंडळाला तात्काळ निधी देऊन प्रस्ताव दाखल केलेल्या लाभार्थींचे प्रस्ताव तात्काळ मंजुर करण्यात यावेत. शासकीय जागेवर घरे बांधून राहणाऱ्या शहरातील, ग्रामीण भागातील नागरीकांना

पी.टी.आर. देऊन शासनाच्या इतर योजनेचा लाभ देण्यात यावा. भटके विमुक्त आदिवासी




समाजातील नागरीकांच्या विकासासाठी स्वतंत्र आराखडा तयार करावा. पारधी भिल्ल समाजातील बांधवाना शासनाने जात प्रमाणपत्रासाठी अडवणूक करण्यात येऊ नये व तात्काळ देण्यात यावे.

लोकनेते गोपीनाथराव मुंडे मागासवर्गीय सुतगिरणी बोगस, बनावट असून विद्याथी, विद्याधीनी, नोकरीदार यांचं परस्पर जात वैधता प्रमाणपत्र घेऊन वस्त्रउद्योगाचे २७ कोटी, समाजकल्याणचे १४ कोटी ऊचलुन शासनास फसवले यांची उच्च पातळीवर चौकशी करण्यता येऊन मुख्यप्रवर्तक संगिता ठोंबरे व चेअरमन विजय प्रकाश ठोंबरे विरूध्द ४२० चा दाखल करून त्यांची सर्व मालमत्ता जप्त करण्यात यावी. केज पोलिस स्टेशनचे वरिष्ठ अधिकारी लोकनेते गोपीनाथराव मुंडे मागासवर्गीय सुतगिरणी चौकशी प्रकरणी वरिष्ठांचे आदेश पायदळी तुडवत आहेत. त्यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी.बीड नगर परिषदेने स्वच्छता टेंडर बंद करून शहरात सफाई काम करणाऱ्या शेकडो महिलांना कामावरून कमी केल्यामुळे शहरात घाणीचे साम्राज्य वाढले आहे. तरी तात्काळ कामावर घेण्यात यावे.

संत भगवान बाबा समाज कल्याण अंतर्गत ऊसतोड मजुरांच्या मुलांचे, मुलीचे वस्तीगृहात निकृष्ट जेवण दिले जात असून सदरील प्रकरणाची तात्काळ चौकशी करावी व टेंडर रद्द करण्यात यावे यासाठी मोर्चा काढण्यात आला. मागण्या मान्य नाही झाल्या तर महाराष्ट्रभर आंदोलन करू असा इशारा पीप्लस रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे मराठवाडा सरचिटणीस तथा जिल्हाध्यक्ष अनिल तुरुकमारे यांनी अधिक तीव्र स्वरूपात आंदोलन करू आसा इशारा दिला आहे.

# मान्सून लीग क्रिकेट सामन्यात शौर्य जाधवची नाबाद आर्धशतकीय पारी

पुणे: ।प्रतिनिधी

पुणे येथील मैदानावर मान्सून लीग १४ वर्षाखालील मुलांचे लसीकरण ३०-३० ओव्हर्सचे क्रिकेट सामने खेळीवण्यात येत आहेत या स्पर्धेत पुण्यातील जवळपास संघाने सहभाग घेतला आसून स्पेशलाईज क्रिकेट संघाकडून खेळतांना शौर्य जाधव यांने पुण्यातील नामांकित स्पार्क संघा विरुद्ध खेळताना नाबाद ६४* धावा केल्या व गोलंदाजी करतांना एक गडी बाद केला. पहिल्यांदा फलंदाजी करतांना स्पार्क संघाने ३०ओहरच्या सामन्यात सर्व बाद १४० धावा केल्या यानंतर हया धावसंख्या चा पाठलाग करतांना स्पेशलाइज क्रिकेट संघाकडून शौर्य ने एका बाजूने धावपट्टीवर एकतर्फी उभा राहत नाबाद ६४ रन्स करून २८.३ षटकांत १४१ रन्स पुर्ण केले यावेळी स्पेशलाइज संघाचे प्रशिक्षक सागर सांगळे सर यांच्या हास्ते शौर्यला सामनावीरचे पारितोषिक देण्यात आले यावेळी पुण्यातील कोचेस व पालकांनी शौर्यचे कौतुक करून अभिनंदन केले.






तालखेड ।प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व ग्रामपंचायत कार्यालय शहापूर मजरा येथे महात्मा गांधी जयंती साजरी करण्यात आली जयंतीनिमित्त शाळेमध्ये तंबाखू मुक्तीची शपथ घेण्यात आली यावेळी ग्रामपंचायत कार्यालय येथे महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन उपसरपंच सूर्यभान फरताडे तर जिल्हा परिषद शाळा येथे अर्जुन आळणे व नवनाथ फरताडे यांच्या हस्ते प्रथमेश पूजन करून जयंती साजरी करण्यात आली यावेळी ग्रामविकास अधिकारी भंडारे साहेब, सरपंच प्रकाश आळणे, पोलीस पाटील बाबासाहेब आळणे, मुख्याध्यापक संतोष साबळे सर, भारत चव्हाण सर,राणुजी धाईजे सुनील अवचार दशरथ अवचार विशाल अवचार आदी मान्यवर उपस्थित होते

# अंशकालीन उमेदवार म्हणजे नेमक कोण ?

महाराष्ट्र शासनाच्या २२/२/२०२१ च्या शासन निर्णयानुसार ज्या व्यक्तीने (१८ जानेवारी २००१) पर्यंतच कोणत्याही सरकारी कार्यालयात किमान ३ वर्ष मानधनावर काम केलेले असावे व त्याच्याकडे अंशकालीन प्रमाणपत्र काढलेले असावे.

सोप्या भाषेत सांगायचे झाल्यास कोणत्याही पदवीधर/पदविकाधारक उमेदवाराला ३-४ वर्ष पदवी किंवा पदविका पूर्ण करायला लागतात. याचा अर्थ किमान वयाच्या २१ वर्षापर्यंत तो उमेदवार मानधनावर काम करू शकत नाही.सदर शासन निर्णयानुसार ( २१ वर्ष वय + ३ वर्ष मानधनावर काम ) या अन्वये २००१ च्या आधी त्या उमेदवारच वयवर्ष ढोबळमानाने किमान १९७८ तरी असायला हवे तेव्हा त्या उमेदवाराला लाभ मिळेल.१९७७-१९७८ नंतर कोणत्याही वर्षी जन्मलेल्या उमेदवाराला अंशकालीन आरक्षणाचा लाभ शासन निर्णयानुसार घेता येणार नाही.आणि जर तसा लाभ घेण्याचा प्रयत्न केला तर त्याचे प्रमाणपत्र १००% खोटे असणार आहे.अश्या बनावट प्रमाणपत्र धारक उमेदवारावर नक्कीच गुन्हा दाखल करू शकतो.सगळ्या विभागातील परीक्षार्थी नी याची नोंद घ्यावी.



आनंदी गुरुकुल चा विद्यार्थी माने चिंतामण याची तालुका स्तरिय ११०मी व ४०० मीटर धावणे स्पर्धेत प्रथम व लांब उडी मध्ये ३रा यावेळे मार्गदर्शन आनंदी गुरुकुल वाघमारे सर,खेडकर उमेश सर प्रा. बी. डी. मेंगडे सर लेफ्टनंट.जे डी चव्हाण सर श्री. बंकटस्वामी महाविद्यालय बीड यांनी मार्गदर्शन केले व सराव घेतला माने चिंतामण व आनंदी गुरुकुल चे सर्व ग्रामीण स्तरातून कौतुक होत आहे

# शेतकऱ्यांच्या मालवाहतूक वाहनांकडून टोल घेऊ नका

## खा.बजरंग सोनवणे यांचर राष्ट्रीय महामार्ग अधिकाऱ्यांना सुचना, झेडपी, जिल्हाधिकारी कार्यालयात मॅरोथॉन बैठक

**बीड ।प्रतिनिधी**

**कधी अस्मानी तर कधी सुल्तानी संकटाचा सामना करणाऱ्या माझ्या शेतकऱ्यांच्या मालवाहतूक वाहनांकडून टोल घेवू नका, अशा शब्दात खा.बजरंग सानवणे यांनी राष्ट्रीय महामार्ग अधिकाऱ्यांना सुचना दिल्या तर जलजीवन मिशनद्वारे नागरिकांना पाणी देण्याचे पुण्याचे काम होत आहे. यात कोणीही पाण्यावर लोणी काढण्याचे पाप करू नये, अशी तंबीही दिली.**

जिल्हा परिषदेत जलजीवन मिशनच्या विषयात ग्रामीण पाणी पुरवठा अधिकाऱ्यांची बैठक खा.बजरंग सोनवणे यांच्या उपस्थितीत पार पाडली. ही बैठक दोन तास सुरू होती. यावेळी त्यांनी अधिकाऱ्यांना पाणी पुरवठ्याची कामे दर्जेदार करून घ्या, कामात हयगय झाली तर कोणीचीही गय केली जाणार नाही, असा इशारा दिला तर जिल्हाधिकारी कार्यालयात रेल्वे आणि राष्ट्रीय महामार्गाबाबतीत आढावा बैठक घेतली.जिल्हा परिषद प्रशासनाकडे असलेल्या जलजीवन मिशन योजनेला मरगळ आलेली असून काही ठिकाणी अर्धवट कामे करून पैसे उचलले जात असल्याचे समोर येत आहे.




पुणे: पुण्यातील बावधन बुद्रुक परिसरात बुधवारी सकाळी एक हेलिकॉप्टर कोसळल्याची घटना घडली आहे. या दुर्घटनेत तिघांचा मृत्यू झाला आहे. प्राथमिक माहितीनुसार, सकाळी पावणेसात वाजता हा अपघात झाल्याचे समजते. अपघातावेळी हेलिकॉप्टरमध्ये दोन वैमानिक आणि एक इंजिनीअर होता. हेलिकॉप्टरणने उड्डाण केल्यानंतर ते मुंबईतील जुहूच्या दिशेने निघाले होते. मात्र, उड्डाण केल्यानंतर काहीवेळातच हेलिकॉप्टर दरीत कोसळले. हा अपघात नेमका कसा घडला, याची नेमकी माहिती समोर आलेली नाही. हा परिसर पुणे-बंगळुरु महामार्गापासून काही अंतरावर आहे.

याठिकाणी एका टेकडीवर ऑक्सफर्ड काउंटी रिसॉर्ट आहे. येथील हेलिपॅडवरुन आज सकाळी या हेलिकॉप्टरने उड्डाण केले होते. मात्र, हा भाग डोंगराळ असल्याने येथे धुके होते. त्यामुळे हेलिकॉप्टरचा अपघात झाल्याचे सांगितले जाते. अपघात झाल्यानंतर हेलिकॉप्टरने लगेच पेट घेतला आणि त्यामध्ये तिघांचा जागीच मृत्यू झाला. बावधन बुद्रुकमधील ऑक्सफर्ड काऊंटी आणि एच.ई.एम.आर. एल. संस्था यामध्ये जो निर्मनुष्य परिसर आहे, तेथील दरीत हे हेलिकॉप्टर कोसळल्याचे सांगितले जाते.



# रामहरी भैया मेटे यांनी बीड विधानसभा लढवावी : पिनू राजे डांगे

(जय शिवसंग्राम पिंपळनेर सर्कल प्रमुख)

**पुढील काही महिन्यांमध्ये होत असलेल्या विधानसभेच्या निवडणुक जय शिवसंग्रामचे संस्थापक अध्यक्ष तथा आमचे मार्गदर्शक रामहरी भैया मेटे यांनी पुढील विधानसभेचे निवडणूक लढवावी अशी मागणी पिंपळनेर सर्कलचे सर्कल प्रमुख पिणू राजे डांगे व मित्रपरिवार यांची इच्छा असल्याची त्यांनी काल बोलून दाखवली.**

विकासाचा वसा आणि स्व.विनायकरावजी मेटे साहेबांचा वारसा पुढे चालवत समाजकारण करण्याचा जो वसा उचलला आहे तो असाच चालू ठेवण्यासाठी पुढील काळातील विधानसभेची निवडणूक लढवावी अशी मागणी पिनु राजे डांगे यांनी केली आहे. व या मागणीवर योग्य तो निर्णय लवकरच घेऊ

असा शब्द रामहरी भैया मेटे यांनी दिला आहे..




# धनगर समाज बांधवांच्या एसटी मध्ये समावेशाची अंमलबजावणी करावी यासाठी मराठा समाज बांधवांचा जाहीर पाठिंबा.

शिरसाळा ।प्रतिनिधी

विषय शिरसाळा येथे धनगर समाजाचा मोर्चाला पाठिंबा म्हणून सकल मराठा समाजाचे कार्यकर्ते यांनी येऊन एसटी प्रवर्गामध्ये आमल बजावणी करण्यासाठी पाठिंबा देण्यात आला आहे धनगर समाजाचे शिरसाळ्यातील व परिसरातील या मोर्चामध्ये पिवळं वादळ तयार झालं होतं आम्हाला एसटीमध्ये आरक्षण मिळाले पाहिजे यासाठी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक शिरसाळा येथे रस्ता रोको करण्यात आला यामध्ये बऱ्याच दिवसापासून ही मागणी लावून धरलेले आहे याकरिता त्यांना एसटी प्रवर्ग मधून अमलबजावणी करण्यात यावी याकरिता शिरसाळ्यातील मराठा समाजाचे मोठ्या संख्येने या मोर्चात पाठिंबा देण्यात आले होते त्यामध्ये समावेश असलेले मराठा समाजाचे नेते .सुमंत उंबरे गोविंद देशमुख दत्तात्रय मोरे अनिल जाधव सर यांनी पत्राद्वारे पाठिंबा दिला आहे ग्रामीण भागामध्ये जातिभेद जास्त होत असल्यामुळे जो तो आपल्या जातीवर जात आहे पण शिरसाळा असे गाव आहे त्या गावाच्या परिसरात एकूण मेकाचा आदर केला जातो आणि असंच प्रत्येक ग्रामीण भागात झालं तर जातीभेद होणार नाही यासाठी प्रत्येक गावात खेड्यामध्ये समाजामध्ये एका समाजाचा एका समाजाने आदर केला तर गावामध्ये जातिवाद नावाची गोष्ट नावाला भी राहणार नाही असे ह्या समर्थनांमधून दिसून येत आहे


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT